मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा कम्पुटर या पदावरील कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यकाच्या पदावर निवडीने भरण्यासाठी

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

शासन निर्णय क्रमांक- परिक्षा - २५०६/प्र.क्र. १५२१ /आस्था-१०

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक - ९ सप्टेंबर, २००७

वाचा:-१)ग्राम विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक परिक्षा- १०८९/ प्र.क्र. २६४/८९/१३, दिनांक - १८ डिसेंबर, १९८९

**<u>शासन निर्णय</u>:-** जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक, भांडार सहाय्यक, भांडारपाल किंवा कॉम्प्युटर या पदावरील कर्मचा-यांना वरिष्ठ सहाय्यकाच्या पदावर निवडीने भरण्यासाठी विभागीय आयुक्तांमार्फत मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परिक्षा घेण्यात येते. विभागीय आयुक्त व जिल्हा परिषद कार्यालयांना तसेच संबंधित कर्मचा-यांना मार्गदर्शनासाठी सदर परिक्षेचा अभ्यासक्रम व त्याबाबतची कार्यवाही या साठी आवश्यक त्या सूचना उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. मात्र स्पर्धात्मक विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणा-या कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता कशाप्रकारे निश्चित करावी याबाबत जिल्हा परिषदांकडून वारंवार विचारणा केली जात होती. या संदर्भात उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ मधील अ.क्र.(नऊ) नंतर अ.क्र. (दहा) पुढील प्रमाणे अंतर्भूत करण्यात येत आहे.

(दहा) मर्यादित स्पर्धात्मक विभागीय परीक्षेतील उमेदवारांचे गुणवत्ता क्रमांक व नियुक्तीचा दिनांक या आधारे कर्मचा-यांची ज्येष्ठता निश्चित करण्यात यावी.

हे परिपत्रक संगणक संकेतांक २००८०१३०१५४५४८००१ अन्वये शासनाच्या वेबसाईटवर www.maharashtra.gov.in.वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

सही/-

(प्रकाश हिर्लेकर )

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति, १)सर्व विभागीय आयुक्त,

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व

३) निवड नस्ती ग्राम विकास व जलसंधारण विभाग, आस्था-१०